# जनावरांत आणि आपल्यात फरकच राहिला नाही

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

माणसाची प्रगती सुरू आहे की अधोगती हेच कळेनासे झाले आहे. जिथे मनोरंजन होते अशा सर्व कार्यक्रमांना अगदी सुट्ट्या टाकून गर्दी करणारे सामाजिक प्रश्नांवरील लढ्यावेळी गायब कुठे होतात? मनोरंजनाच्या कार्यक्रमांना जनसमुदाय उत्साहाने लोटतो, पण या सर्वांचे जीवन सुखकर व्हावे म्हणून कुणी लढा उभारला तर त्याला इतके कमी जण जमतात की एकाच पोलीस गाडीत टाकून त्यांचा विषय संपवला जातो. जनसमुदायाच्या क्रांतीने मिळविलेले आपले स्वातंत्र्य आता क्रांतीसाठी कुणी उतरत नाही म्हणून विषारी विळख्यात अडकत चालले आहे.

शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही म्हणून आत्महत्या होत आहेत. दूध उत्पादक सोमवारपासून संप करणार आहेत. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, रस्त्यावर खड्डे नव्हे तर खड्ड्यात रस्ते आहेत, शिक्षण इतके महाग झाले आहे की परवडत नाही, झोपडपट्ट्या फुगत चालल्या आहेत, रेशनवर काही मिळत नाही, स्वयंपाकाच्या गॅसपासून भाज्यांचे भाव इतके कडाडले आहेत की ताटात वाढायचे काय, हा प्रश्न आहे. हे सर्व प्रश्न आपल्या जगण्याशी निगडित आहेत. आणखीही असंख्य प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवले तर आयुष्य सुखकर होईल, मात्र हे प्रश्न आंदोलन केल्याशिवाय सुटणार नाहीत हेही खरे आहे. मग या प्रश्नांवर जनता आंदोलन का करीत नाही किंवा जो कुणी करतो आहे त्याला आंदोलनात सहभागी होऊन साथ का देत नाही? हे प्रश्न सोडविण्याऐवजी या प्रश्नांमुळे येणाऱ्या मानसिक दबावावर उपाय म्हणून चित्रपट बघायचा का? चित्रपट बघून परतताना उघड्या गटारात पडून एखाद्याचा जीव गेला तर दुसऱ्याच्या घरचा मेला म्हणून घरी परतल्यावर टीव्हीवर मालिका बघत बसायचं का? आपली ही अशी विचित्र मानसिकता का झाली आहे? आंदोलन म्हणजे 'नसती लफडी' असे आपण का म्हणू लागलो आहोत?

आंदोलनं करून काही होत नाही, उगाच कशाला त्रास करून घ्यायचा, असे अनेक जण बोलू लागले आहेत. पण या अनेकांपैकी प्रत्यक्ष आंदोलनात किती जण आजवर सहभागी झाले आहेत? शेतकऱ्यांचे आंदोलन असेल तर त्यात शेतकरीच सहभागी होतात. त्यांचे आंदोलन यशस्वी झाले तर आपल्याला भाजी स्वस्त मिळेल. पण आपण आंदोलनात जात नाही. आपण खिडकीतूनच मोर्चा बघत बसायचा. शेतकरी बिचारे किती संख्येने एकत्र येणार आहेत? त्यांचा एक किलोमीटरचा मोर्चा सरकार मोडून काढते. मग खिडकीतूनच बघत चहा पीत म्हणायचं, काही उपयोग नाही आंदोलन करून, बघा त्या शेतकऱ्यांचे काय झाले. अरे, पण तू सामील झाला असतास, तुझ्यासारखे आणखी सामील झाले असते तर शेतकरी मोर्चाची ताकद वाढून त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या असत्या आणि मग तुलाच भाजी स्वस्त मिळाली असती. आपण मात्र खिडकीत चहा पीत बसायचे आणि आंदोलनानं काही होत नाही म्हणून बोंबलत राहायचे. फारच मानसिक त्रास झाला तर भिकाऱ्याला चार घास देऊन आत्मिक आनंद न मिळविता स्वतःच भिकाऱ्यासारखं देवाच्या दारी उभे राहायचे.

त्यातूनही आपल्या अगदी ओळखीच्या एखाद्याने सामाजिक विषयावर आंदोलन जाहीर केले आणि तो आपल्याला म्हणाला की, तू नक्की ये. तर आपले उत्तर ठरलेलं असतं. मला बॉस सुट्टी देत नाही किंवा रजा शिल्लक नाही किंवा एक दिवसाचा पगार बुडेल, असे काहीतरी सांगून आपण जायचे टाळतो, पण त्याच दिवशी सत्यनारायणाची पूजा असेल, श्रावणाचा गीत गायनाचा कार्यक्रम असेल, भिशी असेल, दहावा - बारावा असेल, गुढीपाडवा असेल नाहीतर गटारी असेल तर आपल्या बॉसच्या, रजेच्या, पगाराच्या सर्व समस्या सुटतात. मनोरंजन, गप्पा, टाईमपास, देवाची भीती वाटल्याचे नाटक यासाठी आपल्याकडे वेळच वेळ असतो. आठवडाभर नटायचं आणि दिवसभर धुमाकूळ घालायचा यातच आपण रमतो. समस्या कायमच्या सोडविण्यासाठी आंदोलनात सहभागी होण्याचे कष्ट घ्यायचे नाहीत. समस्येच्या भोवती फुगड्या घालत काही काळ जिवाची मुंबई करायची.

अलिबागहून आलाय का? म्हटल्यावर किती जण भडकले, बापरे, व्हॉट्सॲपवरून तुटून पडले, पण त्याच अलिबागच्या एकाही सामाजिक प्रश्नावर जागृत नागरिकांचा एकही व्हॉट्सॲप येत नाही. पाडव्याचा जल्लोष, दहीहंडी, विठ्ठलाची वारी, काल्याचं कीर्तन, गणेशोत्सव, नवरात्र सर्व सणांना लाखो लोक रस्त्यावर उतरलेले पाहिले की समाजाच्या भल्यासाठी आंदोलन करणाऱ्यांना प्रश्न पडतो की, त्यांच्यासाठी आम्ही लढायला उतरतो तेव्हा हे सर्व जण असतात कुठे? एका बारचे एक विचित्र नाव बघितले होते. 'कर्तव्य' बार! ज्याने हे नाव ठेवले त्याची दूरदृष्टीच म्हणायची. सतत मनोरंजन हेच आता कर्तव्य झाले आहे. मनोरंजन गरजेचे आहे, पण मनोरंजनापुरते जगणे असू नये. समस्येशी लढण्याची आपल्यात इच्छा नाही, जिद्दही नाही, समस्येवर मनोरंजनाचे मलम लावणे हेच कर्तव्य उरले आहे. भूलभुलय्यातच आयुष्य काढत राहायचं. आपल्यात आणि जनावरांत हळूहळू फरकच उरणार नाही. कारण क्रांती करायची नाही तर मेंदू हवा कशाला? जन्म घ्यायचा, मऊ गादी समजून चिखलात लोळायचं, मिळेल ते खायचं आणि मरून जायचं अशी जनावरं जगतात. त्यांच्या आणि आपल्या जगण्यात फरक कुठे राहिला आहे?